२४ डिसेंबर २०२१ दै. लोकमत

# बदलत्या आंतरराष्ट्रीय संबंधांकडे डोळसपणे पहा

## देवळाणकर : ताराराणी विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या संकटाला तोंड देताना चीन, अफगाणिस्तान या शेजारील राष्ट्रांशी भारताने समन्वय, सावधगिरीने आणि विचारधारेने संबंध जोपासले पाहिजेत. आजच्या आर्थिक परिस्थितीला या राष्ट्रांची आर्थिक धोरणे, राजकीय गणिते आणि इतरांची मुस्कटदाबी करणारी प्रवृत्ती कारणीभूत आहे. त्यामुळे बदलत्या आंतरराष्ट्रीय संबंधांकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय संबंधांचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सोमवारी येथे केले.

येथील ताराराणी विद्यापीठातर्फे डॉ. व्ही. टी. पाटील स्मृती भवनात आयोजित क्रांतिवीर रंगरावदादा पाटील व्याख्यानमालेत 'अफगाणिस्तान, चीन आणि भारत' या विषयावर ते बोलत होते. या विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवानिमित्त काढलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर होते. कोरोनासारखी कृत्रिम महामारी निर्माण करून चीनसारखा देश जगाला हादरवू शकतो. यातून त्याची जागतिक शांतता नष्ट करण्याची तयारी दिसून येते. लॉकडाऊनची स्थिती ही देशाची आर्थिक घडी विस्कटणारी मानवनिर्मित व्यवस्था या राष्ट्रांनी उभारून गरिबी, बेरोजगारीची भयानकता वाढवली, असे देवळाणकर यांनी सांगितले. चीन आणि अफगाणिस्तानच्या राजकीय हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून



कोल्हापुरात सोमवारी ताराराणी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय राजकीय आणि परराष्ट्रीय धोरणाचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचे व्याख्या[न] झाले.

### भविष्यात व्हायरस येतच राहतील

चीन अतिक्रमण करणारा देश असल्याने कोरोनासारखे अनेक व्हायरस भविष्यात जगभरात येतच राहतील. त्याला प्रत्येक देशाने तोंड दिले पाहिजे, असे डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.

भारताने सूक्ष्म नियोजन करावे, असे चौसाळकर यांनी सांगितले. यावे[ळी] ताराराणी विद्यापीठाचे कार्यक[ारी] अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटी[ल,] उपाध्यक्ष एस. एन. पवार, स[चिव] प्राजक्त पाटील, विश्वस्त का[...] पाटील डॉ. सी. आर. गोडसे, जे. [...] पाटील, विजय पाटील, सुजय पा[टील] उपस्थित होते. डॉ. आझाद नायक[वडी] यांनी क्रांतिवीर रंगरावदादा पा[टील] यांच्या जीवनकार्यावर पोवाडा स[ादर] केला. एस. डी. चव्हाण य[ांनी] सूत्रसंचालन केले.